महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ 10 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 226 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

मुंबईत काँग्रेसचा स्वबळाचा नारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शिवसेने पाठोपाठ आता मुंबईत काँग्रेसचा देखील स्वबळाचा नारा. आगामी मुंबई महापालिका निवडणूकीच्या पार्शवभूमीवर मुंबई काँग्रेसची बैठक संपन्न झाली. बैठकीत सर्व कार्यकर्त्यांनी केली स्वतंत्र लढण्याची इच्छा व्यक्त. एकटं लढल्यास सर्वांना समान न्याय मिळेल आणि लढायला बरं पडेल अशी भावना कार्यकर्त्यांनी बैठकीत व्यक्त केली आहे.

राहुल सोलापूरकरांच्या पोलिस बंदोबस्तात वाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वादग्रस्त विधानांच्या पार्श्वभूमीवर अभिनेता राहुल सोलापूरकर यांच्या निवासस्थानी पुणे पोलिसांचा बंदोबस्त पुन्हा एकदा वाढ करण्यात आली आहे. राहुल सोलापूरकरांनी आपलं विधान मागे घ्यावं, अशी मागणी आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केलीय. तर इतिहासावर बोलणं टाळावं, असा सल्ला उद्योगमंत्री उदय सामंत यांनी राहुल सोलापूरकरांना दिलाय. तर 'जो शिकलेला आहे तो ब्राम्हणच असेल असं राहुल सोलापूरकर म्हणतायत. त्यांनी बाबासाहेबांना ब्राम्हण करून टाकले आहे. यांच्या कानशिलात बजावली की मनुवाद बरोबर जागा होईल.काय गरज आहे बाबासाहेब आणि महाराजांबद्दल बोलायची? आणि उगाच समाजात विष कालवायची?' असा संतप्त सवाल जितेंद्र आव्हाड यांनी विचारला.

रूंदे गावात मोराची शिकार करणाऱ्यास अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्यातील कल्याण-मुरबाड रस्त्यावरील रुंदे गाव हद्दीतील आदिवासी वाडीतील एका इसमाला कल्याण, खडवली वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी शनिवारी अटक केली आहे. या इसमाने मोराची शिकार केल्याचे वन अधिकाऱ्यांच्या चौकशीत निष्पन्न झाले. त्यांना कल्याण जिल्हा न्यायालयात रविवारी सुट्टीकालीन न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले असता, न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची वन कोठडी सुनावली.

गणेश श्रावण फसाळे (३५, रा. रुंदे, आदिवासीपाडी, ता. कल्याण) असे अटक करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे. ते वीटभट्टी मजूर आहेत. कल्याण वनपरिक्षेत्रातील फळेगाव वन विभागात मोराची शिकार होत असल्याची गुप्त माहिती वन विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. ठाणे उपवनसंरक्षक, साहाय्यक वनसंरक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण वन परिक्षेत्र अधिकारी, खडवली वन परिमंडळाचे अधिकारी शनिवारी रात्री साडे अकरा वाजता कल्याण मुरबाड रस्त्यावरील रूंदे गाव हद्दीत पोहचले.मिळालेल्या माहितीप्रमाणे त्यांनी वीटभट्टीवर काम करणाऱ्या गणेश फसाळे यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. गणेश यांनी आपण जंगलात मोराची शिकार केल्याची कबुली वनाधिकाऱ्यांना दिली. हत्या केलेल्या मोराचे अवयव एका चुलीवर एका पातेल्यात शिजवले असल्याचे गणेशने वनाधिकाऱ्यांना सांगितले.

रिक्षाचालकाचा टॅक्सी चालकावर हल्ला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात रिक्षा चालकांची दादागिरी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. काही दिवसांपूर्वीच रिक्षाचालकाने प्रवाशावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली होती. या घटनेला काही दिवस उलटत नाही तोच एक रिक्षाचालकाने प्रवासी घेण्यावरून टॅक्सी चालकाशी हुज्जत घातली इतकेच नव्हे तर या वादातून रिक्षाचालकाने टॅक्सी चालकावर प्राणघातक हल्ला केला. सय्यद मैनुद्दीन असे जखमी टॅक्सी चालकाचे नाव असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

'प्रवासी सेवा हिचं ईश्वर सेवा'

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मौलिक सल्ला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे,दि.09 : एसटीच्या पुनरुत्थानासाठी एसटी कर्मचाऱ्यांनी " प्रवासी सेवा हीच ईश्वर सेवा!" समजून काम केले पाहिजे. त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यास आमच्या शासन सक्षम आहे. असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी केले. ते खोपट बसस्थानकावरील नुतनीकरण करण्यात आलेल्या वातानुकूलित चालक -वाहक विश्रांतीगृहाच्या लोकार्पण सोहळ्याच्या वेळी बोलत होते. या कार्यक्रमाला राज्याचे परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक आरोग्यमंत्री श्री.प्रकाश आबिटकर अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्यासह एस. टी. महामंडळाचे प्रभारी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विवेक भीमनराव हे उपस्थित होते. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, एसटीचा

चेहरा -मोहरा बदलून " फाईव्ह स्टार " परिवहन सेवा निर्माण करणे हे आपल्या शासनासमोरील प्रमुख ध्येय असून प्रवाशांना एअरपोर्ट सारखी बसपोर्ट उपलब्ध करून देण्यासाठी खाजगी- सार्वजनिक भागीदारीतून नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यावर एसटी महामंडळाने भर दिला पाहिजे. मागील वर्षी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (MIDC) माध्यमातून ५०० कोटी रुपये खर्चून एसटीच्या १९१ बसस्थानक परिसराचे काँक्रिटीकरण करण्याचे काम आपण हाती घेतल्या असून "खड्डेमुक्त बसस्थानक" हा आपला संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

एसटीच्या चालक वाहकांना आपले कर्तव्य करून आल्यानंतर ताण-तणाव मुक्त झोप मिळावी यासाठी प्रत्येक आगारांमध्ये वातानुकूलित, स्वच्छ व टापटीप असे विश्रांतीगृह निर्माण करण्यात यावे असे निर्देश त्यांनी यावेळी एस टी प्रशासनाला दिले. खोपट बसस्थानकावरील नुतनीकरण केलेल्या विश्रांतीगृहाबाबत समाधान व्यक्त करून हे " रोल मॉडेल " संपूर्ण राज्यभर राबवण्याच्या सूचना देखील त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी बोलताना राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी यापुढे राज्यभरात सार्वजनिक -खाजगी भागीदारीतून निर्माण होणाऱ्या प्रकल्पामध्ये आगार तेथे १०० खाटांचे कॅशलेस रुग्णालय उभारण्याच्या संकल्प असून माननीय उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसा दिनी या योजनेचा आम्ही शुभारंभ करीत आहोत. भविष्यात या रुग्णालयांमध्ये शासनाच्या महात्मा फुले जन आरोग्य योजनेबरोबर विविध वैद्यकीय सेवा सुविधा मोफत एसटीच्या कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार असून त्याचा फायदा त्या परिसरातील प्रवासी व सर्वसामान्य जनतेला देखील मिळणार आहे.

कल्याण तालुक्यातील वालकस येथे भव्य पशु दवाखाना

सर्वच प्राण्यावर होणार मोफत उपचार व शस्त्रक्रिया

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्यातील वालकस येथील परमधाम सेवा आश्रमात राष्ट्रसंत परम गुरुदेव श्री नम्रमुनी महाराज साहेब यांच्या सर्व प्राणी मात्रावर दया करा, प्राण्याचे सांगोपन व संरक्षण करा, या विचारधारेतून प्राण्यासाठी भव्य प्राणी चिकित्सालय व शस्त्रक्रिया गृह तसेच सांगोपन गृह उभारण्यात येणार आहे. ठाणे जिल्ह्यासह मुंबई मध्ये प्राण्यासाठी स्वतंत्र वैद्यकीय उपचार व्यवस्था नसल्याने हजारो प्राणी आपला जीव गमवतात, विकलांग होतात. ही त्यांची अवस्था अस्वस्थ करणारी ठरते त्याच हेतूने राष्ट्रसंत परम गुरुदेव नम्रमुनी महाराज यांनी वालकस गावाजवळ भातसा नंदी किनारी हे पशु वैद्यकीय चिकित्सा व उपचार केंद्र अर्थात दवाखाना सुरु करण्याचा मनोदय आज त्यांच्या दिक्षा संपादन दिनाचे औचित्य साधत आपल्या भक्त परिवाराशी संवाद साधताना केले, हे पशु चिकित्सा केंद्र व वैदकीय उपचार दवाखाना या वर्षाच्या डिसेंबर अखेर सुरु होईल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सुतोवाच केले. 9 फेब्रुवारी रोजी दिवसभर वालकास येथे मोफत शस्त्रक्रिया प्राण्यावर करण्यात आल्या. ते स्वतः त्यावेळी उपस्थित होते.

नम्रमुनी महाराज

सर्व प्राण्यांबद्दल करुणा पसरवणारे निस्वार्थी हृदय. सामान्य गोष्टींपेक्षा जास्त जाणणारा आणि विचार करणारा दूरदर्शी. तीर्थंकरांनी शिकवलेल्या कालातीत सत्यांचे स्पष्टीकरण देणारा एक ज्ञानी गुरु. हे परम गुरुदेव आहेत .राष्ट्रसंत परम गुरुदेव श्री नम्रमुनी महाराज साहेब हे एक आध्यात्मिक नेते, समाजसुधारक आणि मानवतावादी आहेत जे जगभरातील असंख्य जीवनात सकारात्मक बदल घडवून आणतात. परम गुरुदेव हे भगवान महावीरांच्या आदरणीय परंपरेतील एक आदरणीय जैन संत आणि पारसधामचे संस्थापक आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज कुंभमेळ्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे आयोजित करण्यात आलेल्या महाकुंभमेळ्याला आतापर्यंत कोट्यवधि भाविकांनी भेट दिली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्रिवेणी संगमावर जाऊन अमृतस्नान केले. आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूही उद्या सोमवारी (१० फेब्रुवारी) महाकुंभमेळ्याला जाणार आहेत. राष्ट्रपती भवन कार्यालयातून ही माहिती मिळाली आहे. पौष पौर्णिमेला (१३ जानेवारी) सुरू झालेला महाकुंभ हा जगातील सर्वात मोठा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मेळावा आहे, जो जगभरातील भाविकांना आकर्षित करतो. हा मेळा २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीपर्यंत सुरू राहील. "प्रयागराज येथील त्यांच्या एकदिवसीय दौऱ्यादरम्यान, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संगम येथे पूजा करून पवित्र स्नान करतील. अक्षयवट आणि हनुमान मंदिरात पूजा आणि दर्शन घेतील. तसंच डिजिटल कुंभ अनुभव केंद्राला देखील भेट देतील", असे राष्ट्रपती भवनाने रविवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील पनवेल एक्झीट उद्यापासून सहा महिने बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई-पुणे महामार्गावर प्रवास करणाऱ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील पनवेल येथील मुंबईकडे जाणारा एक्झिट मार्ग कळंबोली सर्कलमधील बांधकामामुळे ११ फेब्रुवारीपासून सहा महिन्यांसाठी पूर्णपणे बंद राहणार आहे.त्यामुळे प्रवाशांना पर्यायी मार्गाचा वापर करावा लागणार आहे. नेमके हे पर्यायी मार्ग काय असतील हे आपण जाणून घेणार आहोत.

कळंबोली जंक्शन सुधारणा प्रकल्प या अंतर्गत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) नवीन उड्डाणपूल आणि अंडरपास बांधण्याचे काम सुरू करत आहे, त्यामुळे हा मार्ग बंद ठेवण्यात येणार आहे.

नवी मुंबई वाहतूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार याचा परिणाम सर्व प्रकारच्या वाहतुकीवर होणार आहे. यामध्ये हलक्या तसेच जड वाहनांच्या वाहतुकीचा देखील समावेश आहे. पनवेल, मुंब्रा आणि जेएनपीटीकडे जाणारी वाहने यामुळे प्रभावित होतील. या परिसरातील वाहतूक कोंडी टाळणे आणि बांधकाम सुरळीत पार पडावे यासाठी हे निर्बंध २४ तास लागू असतील.

दरम्यान या काळात वाहतूक सुरळीत सुरू राहावी यासाठी अधिकाऱ्यांनी पर्यायी मार्ग सुचवले आहेत. ज्यानुसार मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरून पनवेल, गोवा आणि जेएनपीटीकडे जाणारी वाहने कोनफाटा (९.६०० किमी) येथे पळस्पे सर्कल मार्गे राष्ट्रीय महामार्ग-४८ वर वळवली जातील.

यादरम्यान पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या आणि तळोजा, कल्याण आणि शिळफाट्याकडे जाणाऱ्या वाहनांना १.२०० किमी अंतरावरून पनवेल-सायन महामार्गावर सरळ पुढे जावे लागेल आणि पुरुषार्थ पेट्रोल पंप उड्डाणपुलाखाली उजवीकडे वळून रोडपाली आणि राष्ट्रीय महामार्ग-४८ मार्गे पुढे जावे लागेल.

नवी मुंबईचे पोलीस उपायुक्त (वाहतूक) तिरूपती काकडे यांनी या निर्बंधासंबंधीचे आदेश मोटार वाहन कायद्याअंतर्गत जारी केले आहेत. एमएसआरडी बांधकाम पूर्ण करत नाही तोपर्यंत हे आदेश लागू राहतील. एकदा हा प्रकल्प पूर्ण झाला की कळंबोली सर्कल येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटेल अशेही काकडे यावेळी म्हणाले.

मलंगगड उत्सवासाठी दोन्ही शिवसेनेची मोर्चेबांधणी

यंदा १२ फेब्रुवारी रोजी महाआरती केली जाणार आहे. शिवसेनेच्या फुटी नंतर येथे शिवसेनेचे दोन्ही गट सक्रिय असतात. मलंगगडाच्या मुद्द्यावर दोघांचे एकमत आहे. येत्या १२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या उत्सवासाठी दोन्ही गटांनी जय्यत तयारी केली असून दोन्ही गटांनी येथे भाविकांना मोठ्या संख्येने येण्याचे आवाहन केले आहे.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ: हिंदूंची वहिवाट हीच मलंग मुक्तीची पहाट अशी घोषणा करत काही दशकांपूर्वी शिवसेनेचे आनंद दिघे यांनी सुरू केलेला मलंग उत्सव येत्या माघ पौर्णिमेला १२ फेब्रुवारी रोजी होणार आहे. यानिमित्त शिवसेनेच्या दोन्ही गटांनी जय्यत तयारी सुरू केली आहे. दोन्ही गटाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी नुकत्याच याबाबत बैठका घेत भाविकांना आणि समर्थकांना सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

अंबरनाथ तालुक्यातील मलंग गड हा गेल्या काही वर्षात कायमच वादाचा आणि अस्मितेचा मुद्दा राहिला आहे. येथे हिंदू आणि मुस्लिम अशा दोन्ही धर्माच्या अनुयायांकडून पूजा केली जाते. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद दिघे यांनी हिंदूची वहिवाट हीच मलंग मुक्तीची पहाट अशी घोषणा दिली होती. त्यानंतर दरवर्षी माघ पौर्णिमेला मलंग गडावर जात आरती केली जाते. यंदाही १२ फेब्रुवारी रोजी येथे आरती केली जाणार आहे. शिवसेनेच्या फुटी नंतर येथे शिवसेनेचे दोन्ही गट सक्रिय असतात. या मुद्द्यावर दोघांचे एकमत आहे. येत्या १२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या उत्सवासाठी दोन्ही गटांनी जय्यत तयारी केली आहे. दोन्ही गटांनी येथे भाविकांना मोठ्या संख्येने येण्याचे आवाहन केले आहे.

विशेष म्हणजे गेल्या वर्षी येथे मलंग गडाच्या पायथ्याशी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने येथे भव्य हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः मलंग गडाच्या बाबतीत तुमच्या मनात असलेला निर्णय होईल, असे सांगत मलंग मुक्तीची घोषणा केली होती. मात्र त्यावर ठोस निर्णय होऊ शकलेला नाही. मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी या भागात विविध विकासकामे करण्यावर भर दिला आहे. याच भागात काही वर्षांपूर्वी हिंदू धर्मा सभा आयोजित करण्यात आली होती.

आजही शिंदे आणि त्यांचे पदाधिकारी तसेच शिवसेना ठाकरे गटाचे पदाधिकारी येथे सक्रियपणे असतात. आता येत्या १२ फेब्रुवारी रोजी मलंग गडावर आरती केली जाणार असून त्यासाठी एकनाथ शिंदे येण्याची शक्यता आहे. सध्या पोलीस आणि महसूल प्रशासन येथे विविध तयारी करण्यात व्यस्त आहे.

आनंदवन हे मानवतेचं मंदिर - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

आर्थिक कोंडीत सापडलेल्या आनंदवनला नवी उमेद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

चंद्रपूर : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या (PM Modi) स्वप्नातील भारतात देश 2027 पर्यंत कुष्ठरोग मुक्त झाला पाहिजे, त्यासाठी आपल्याला मोठं कार्य करायचे आहे. रुग्णांच्या संख्येत घट होत असली मात्र आपलं टास्क अजून मोठं आहे. त्यासाठी संस्थांची मदत घेणं आवश्यक आहे. उद्योग मंत्री उदय सामंत (Uday Samant) यांनी स्किल डेव्हलपमेंट सेंटरसाठी अतिशय चांगलं काम केलं आहे. मात्र 2012 नंतर कुष्ठरोगाच्या रुग्णांना देण्यात येणाऱ्या अनुदानात कुठलीही वाढ केलेली नाही, त्यामुळे या अनुदानात प्रति व्यक्ति 2200 रूपयांवरून 6000 करण्याची मी घोषणा याठिकाणी करतो, तसेच पुनर्वसन अनुदानात बदल करून 2000 ची रक्कम ही 6000 रुपये इतकी करत असल्याची ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (Devendra Fadnavis) यांनी केली आहे. यासह कॉर्पस फंडमध्ये 10 कोटी रुपये देण्याची घोषणा ही त्यांनी केली आहे. चंद्रपूरच्या वरोरा तालुक्यातील आनंदवन प्रकल्पाला आज (9 फेब्रुवारी) 75 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित आनंदवन मित्र मेळावा कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. तसेच या कार्यक्रमाला उद्योगमंत्री उदय सामंत यांनी देखील उपस्थिती लावली होती. महारोगी सेवा समितीच्या वतीने आयोजित 75 वर्षपूर्ती कृतज्ञता मित्र मेळाव्या प्रसंगी मुख्यमंत्र्यांनी ही भरघोष घोषणा केली आहे.

आनंदवन हे मानवतेचं मंदिर - देवेंद्र फडणवीस

आनंदवन हे मानवतेचं मंदिर आहे. मानवी संवेदानांची व्याख्या ही बाबा आमटे यांच्या कार्यातून दिसून येते. खऱ्या अर्थाने ज्यावेळी बाबांनी हे कार्य सुरू केलं त्या वेळी हे कार्य अतिशय कठीण होतं, शिवाय कुष्ठरोग्याबद्दल समाजात तिरस्काराची भावना होती. मात्र आज या प्रकल्पासोबत स्वतः ला जोडल्या गेल्याचे समाधान वाटतंय. चंद्रपूर सारख्या मागास, आदिवासी बहुल भागात हे कार्य 75 वर्षापूर्वी हातात घेतलं आणि आज हे कार्य विविध क्षेत्रामध्ये मोठं आणि बहुमोल स्वरूपाचे झाले आहे. त्यासाठी विकास भाऊ, प्रकाश भाऊ यांनी त्याचा सातत्याने विस्तार केला आहे.

वाचक मनोगत

उबाठाची आश्वासने हवेतच विरली

मुंबईच्या डबेवाल्यांना गेल्या पालिका निवडणूकीच्यावेळी दिलेली आश्वासन पूर्ण न केल्यामुळे डबेवाला संघटनेने शिवसेना (ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याविषयी नाराजी व्यक्त केली आहे. पालिकेची निवडणूक या वर्षभरात होण्याची शक्यता असून डबेवाल्यानी त्याआधीच आपली नाराजी व्यक्त केली आहे. शिवसेनेच्या २०१७ च्या मुंबई महानगरपालिका निवडणूकीच्या वेळी वचननाम्यामध्ये मुंबईतील डबेवाल्यांनसाठी काही आश्वासने दिली होती. त्यापैकी फक्त डबेवाला भवनाव्यतिरिक्त दुसरे कोणतेच आश्वासन त्यांनी पूर्ण केले नाही. त्यामुळे डबेवाला कामगारांमध्ये शिवसेना (ठाकरे) पक्षाबद्दल मोठ्या प्रमाणावर नाराजी असल्याची प्रतिक्रिया मुंबई डबेवाला असोशिएशनचे अध्यक्ष सुभाष तळेकर व्यक्त करत आहेत.

मुंबई महानगर पालिकेत शिवसेनेची पाच वर्षे सत्ता होती. काही काळ उध्दव ठाकरे हे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री होते. तरीही वचने पूर्ण झाली नाहीत. आपण अनेकदा याबाबत उध्दव ठाकरे यांना पत्र लिहले पण काहीही कार्यवाही झाली नाही. जर आश्वासन पूर्ण करायची नव्हती तर ती आश्वासने त्यांनी द्यायलाच नको होती, अशी सर्व साधारण भावना डबेवाला कामगारात आहे. दरम्यान, शिवसेनेची दोन शकले पडल्यानंतर डबेवाला संघटनेने उद्धव ठाकरे यांना जाहीर पाठिंबा दर्शवला होता. मात्र येत्या पालिका निवडणूकीच्या तोंडावर डबेवाला संघटनेने अशी जाहीर नाराजी व्यक्त केल्यामुळे ही नाराजी ठाकरेना भोवणार हे मात्र नक्की

- प्राजक्त किशोर बेर्डे
शिवाजी नगर, मुंबई

अयोध्या पराभवाचा बदला

दिल्ली विधानसभा निवडणुकीबरोबर उत्तर प्रदेशातील मिल्कीपूर विधानसभा मतदारसंघाचीही पोटनिवडणूक पार पडली होती. या प्रतिष्ठीत लढतीत भाजपाने विजय मिळवला असून, चंद्रभानू पासवान यांनी समाजवादी पक्षाचे उमेदवार अजित प्रसाद यांना ६१,७१० मतांनी पराभूत केले. फैजाबाद लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या मिल्कीपूर विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भाजपा ने सर्वस्व पणाला लावले होते. कारण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत फैजाबादमध्ये भाजपाचा पराभव झाला होता आणि याच मतदारसंघात अयोध्येचाही समावेश आहे. भाजपाच्या या पराभवानंतर त्यांची देशभरातून खिल्ली उडवण्यात आली होती. फैजाबादमधून लोकसभा निवडणुकीत विजयी झालेले सपाचे उमेदवार अवधेश प्रसाद यांनी मिल्कीपूरच्या आमदारकीचा राजीनामा दिला होता, त्यामुळे ही पोटनिवडणूक लागली होती. यावेळी भाजपाच्या उमेदवारासमोर अवधेश प्रसाद यांचे पुत्र अजित प्रसाद सपाचे उमेदवार होते.

जातीय समिकरणे :

भाजपाच्या विजयावरून असे दिसून येते की, मुलिम आणि यादव मतदार समाजवादी पक्षाच्या उमेदवाराबरोबर राहिले असले तरी, पासी आणि इतर अनुसूचित जाती समुदाय भाजपाच्या मागे उभे राहिला आहे. दरम्यान लोकसभा निवडणुकीत, पासी समुदायाच्या मतदारांनी समाजवादी पक्षाच्या विजयात महत्वाची भूमिका बजावली होती. पण, आता परिस्थिती बदलली आहे.अनुसूचित जातींसाठी राखीव असलेल्या मिल्कीपूर विधानसभा मतदारसंघात सुमारे १.२५ लाख अनुसूचित जातीचे मतदार आहेत. त्यापैकी सुमारे ७०,००० पासी समाजाचे आहेत. तर मुस्लिम आणि यादव समाजाचे मतदार अनुक्रमे सुमारे ५५,००० आणि ३२,००० इतके आहेत. दुसरीकडे चौरसिया, विश्वकर्मा, मौर्य आणि चौहान यांसारख्या इतर मागासवर्गीयांनी भाजपला पाठिंबा दिल्याचे दिसून येते. ज्यांची संख्या ३० हजार इतकी आहे.

सपा उमेदवाराला सुरुवातीपासून विरोध :

मुस्लिम आणि यादव वगळता जवळजवळ सर्व समुदायातील लोकांचा अजित यांच्या पोटनिवडणुकीतील उमेदवारीला विरोध झाल्याचे पाहायला मिळाले. त्यांचे असे मत होते की, सपाने दुसऱ्या कोणत्याही उमेदवाराला उमेदवारी दिल्यास चुरशीची लढाई झाली असती. तर मतदारसंघातील काहींचे असे मत होते की, फैजाबादचे खासदार लोकसभा विजयानंतर अहंकारी झाले असून, त्यांच्या मुलांप्रमाणे ते नागरिकांसाठी अनुपलब्ध झाले आहेत. याबाबत इंडियन एक्सप्रेसने वृत्त दिले आहे. अनेक पासी-बहुल गावातील लोकही अजित यांच्या उमेदवारीवर नाराज होते. त्यांचा असा दावा आहे की, अवधेश यांनी त्यांच्या मुलाला उमेदवारी देत त्यांच्यासोबत काम करणाऱ्यांचा विचार केला नाही. त्यामुळे पासवान त्याच समुदायाचे असल्याने त्यांना संधी मिळायला हवी.

आदित्यनाथांनी घेतली प्रचाराची जबाबदारी

दुसरीकडे मिल्कीपूर विधानसभेची पोटनिवडणूक जिंकण्यासाठी जिंकण्यासाठी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सर्वाधिक प्रयत्न केले. यासाठी त्यांनी स्वतः प्रचाराची जबाबदारी घेतली होती. निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्र्यांनी आठपेक्षा जास्त वेळा मतदारसंघाला भेट दिली. याचबरोबर प्रचारासाठी नऊ मंत्री आणि ४० आमदारांनाही मतदारसंघात पाठवले होते.

सावित्रीबाई फुले - विद्यापिठाचा स्थापना दिन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्यातील पुणे मधील एक विद्यापीठ आहे. मराठी भाषेच्या व संस्कृतीच्या अभ्यासासाठी आणि संशोधनासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजी झाली. या संस्थेचे मुख्य आवार ४११ एकर क्षेत्रांत पसरलेले आहे. मुकुंद रामराव जयकर हे पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. भारताच्या काही प्रसिद्ध विद्यापीठातील हे एक विद्यापीठ आहे. पुणे विद्यापीठाची स्थापना पुणे विघापीठ अधिनियमच्या अधीन केली गेली, ज्याला १० फेब्रूवरी १९४८ला मुंबई विधान-मंडल ने पारित केले. त्याच वर्षी, डा एम० आर० जयकर यांनी विघापीठचे प्रथम उपकुलपतिचे पदभार ग्रहण केले. श्री बी० जी०खैर, जे मुंबई सरकार (विधान-मंडल)चे मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्री होते, त्यांच्या प्रत्यनातुन विघापीठला को मोठा भूखण्ड मिळवून देण्यासाठी मदत केली. प्रारंभिक १९५० मध्ये, विद्यापीठाला ४११ एकर भूमि आवंटित केली गेली. पुणे विद्यापीठाची स्थापना झाली, तेव्हा पश्चिम महाराष्ट्रातील १२ जिल्हे त्या विद्यापीठाच्या अखत्यारित होते. इ.स. १९६२ मध्ये त्यांतून काही जिल्हे वगळून कोल्हापूर येथे स्थापन झालेल्या शिवाजी विद्यापीठच्या अखत्यारित गेले. इ.स. १९९० मध्ये धुळे व जळगाव यांसाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन झाले. आता फक्त पुणे, नगर, नाशिक हे तीनच जिल्हे पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येतात.

हिंदूं मंदिराकडे वाकड्या नजरेने पाहणार नाही, असे संघटन हवे मंत्री ! - नितेश राणे

भारत हे हिंदु राष्ट्र आहे; कारण या राष्ट्रात ९० टक्के हिंदू समाज आहे. राज्य आणि केंद्र सरकार हे प्रखर हिंदुत्ववादी आहे. यापुढील प्रवासही मंदिरे व हिंदु समाज यांना भिती न बाळगता कार्य करता येईल. आपल्या भारतीय संस्कृतीचा मंदिर हा इतिहास आहे. जेव्हा इस्लामिक आक्रमक आले तेव्हा त्यांनी व्यक्ती किंवा संस्थानवर नाही तर मंदिरांवर हल्ले केले. भारताला मजबूत बनविणारी मंदिरे असल्याने इस्लामिक आक्रमकांनी प्रथम मंदिरांना लक्ष्य करून मंदिरे उद्धवस्त केली; मात्र यापुढे हिंदु राष्ट्र निर्मितीत मंदिरे महत्त्वाची भूमिका बजावतील. हिंदूंच्या मंदिराकडे कोणी वाकड्या नजरेने पाहणार नाही, तसेच मंदिराच्या विरोधात विचार करण्याचीही हिंमत होणार नाही असे संघटन निर्माण करू, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे मत्स्य व्यवसाय आणि बंदरे विकासमंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. नितेश राणे यांनी केले. ते सिंधुदुर्गातील माणगाव (कुडाळ) येथील श्रीदत्त मंदिराच्या सभागृहात श्रीदत्त मंदिर न्यास माणगाव, महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि हिंदु जनजागृती समिती द्वारा आयोजित द्वितीय जिल्हास्तरीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास अधिवेशना'त बोलत होते.

या अधिवेशनाचे उदघाटन श्रीदत्त मंदिर संस्थानचे अध्यक्ष श्री. सुभाष भिसे, सचिव श्री. दीपक साधले, सनातन संस्थेचे धर्मप्रचारक संत सदगुरु सत्यवान कदम, मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट व मंदिर महासंघाचे कोअर टीमचे सदस्य श्री. अनुप जयस्वाल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले. या वेळी पालकमंत्री श्री. नितेश राणे, भाजपचे जिल्हाध्यक्ष श्री. प्रभाकर सावंत, जिल्हा बँक अध्यक्ष श्री. मनीष दळवी, माजी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. रणजीत देसाई, सनातन संस्थेच्या धर्मप्रचारक सदगुरु स्वाती खाडये, माणगाव गावच्या सरपंच सौ. मनिषा भोसले आणि श्रीदत्त संस्थान अक्कलकोट स्वामी भक्त परिवाराचे अध्यक्ष डॉ. वि.म. काळे यांचीही उपस्थिती होती. प्रारंभी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांनी या मंदिर परिषदेच्या निमित्ताने पाठविलेल्या संदेशाचे वाचन करण्यात आले. या वेळी मंदिर महासंघाच्या वतीने पालकमंत्री नितेश राणे यांना काही मागण्याचे निवेदन देण्यात आले. या मागण्यांसंदर्भात शासन स्तरावरून पाठपुरावा करून योग्य कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही मंत्री श्री. नितेश राणे यांनी दिली.

सर्व मंदिरे सरकारच्या नियंत्रणातून मुक्त होईपर्यंत हा लढा चालू ठेवणार ! - सुनील घनवट

सेक्युलर म्हणवणारी सरकारे मंदिरांना कोणताही निधी देत नाहीत, धर्माच्या संदर्भात कोणतेही साहाय्य किंवा कार्य करत नाहीत, तर मग त्यांना मंदिरे चालवण्याचा अधिकार कसा काय प्राप्त होतो ? हे सेक्युलर राजकारणी कोणतीही मशीद किंवा चर्च सरकारच्या नियंत्रणात आणू शकत नाहीत. मग हिंदु मंदिरांच्या संदर्भातच हा दुजाभाव का ? सर्व मंदिरे सरकारच्या नियंत्रणातून मुक्त होईपर्यंत हा लढा चालू रहाणार आहे. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक देवस्थानच्या जागा काही जणांच्या माध्यमातून बळकावण्याचा प्रयत्न केला जात आहे. याकडे जिल्हा प्रशासन व पालकमंत्री नितेश राणे यांनी लक्ष घालून देवस्थानच्या जागा देवस्थानलाच मिळाव्यात यासाठी ठोस भूमिका घ्यावी, असे आवाहन मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी या वेळी केले.

मंदिरांच्या सरकारीकरणामुळे अनेक समस्या; मंदिरे ही उपासनेची केंद्र व्हावी ! - सदगुरू सत्यवान कदम

या वेळी सनातन संस्थेचे सदगुरू सत्यवान कदम म्हणाले की, भारतीय संस्कृतीची नाळ मंदिरांशी जोडलेली आहे. मंदिरे ही समाजासाठी चैतन्याची स्त्रोत आहेत; परंतु आज आपण पाहतो मंदिरांचे सरकारीकरण आणि मंदिरातील भ्रष्टाचार यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे मंदिर संस्कृतीवर होणारे आघात वेळीच रोखण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. मंदिरे हे आपल्या हिंदूंची आधारशीला आहेत. मंदिरेही धर्मशिक्षणाची केंद्र बनले पाहिजे त्यासाठी आपण प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. आज धर्मशिक्षण नसल्यामुळे आपल्या मुली लव्ह जिहादला बळी पडत आहे. धर्मांतरण होत आहे. मंदिरातून लहानांसाठी बालसंस्कारवर्ग, किशोरांसाठी सुसंस्कारवर्ग, युवांसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षणवर्ग आणि मोठ्यांसाठी सत्संग चालू करणे आवश्यक आहे. मंदिरे ही उपासनेची केंद्र बनली पाहिजेत. या वेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना हिंदु जनजागृती समितीचे श्री. राजेंद्र पाटील यांनी म्हणाले की, वैयक्तिक जीवनाबरोबर सामाजिक जीवनात मंदिरांना विशेष महत्त्व आहे. मंदिरांमुळेच हिंदूंमध्ये धर्माचे अधिष्ठान निर्माण होते. या वेळी अन्य मान्यवरांनी आपले विचार मांडले.



मुलांवर बळजबरी नको

आपण पालक म्हणून मुलांचे भलेच व्हावे, अशीच अपेक्षा बाळगतो. प्रत्येक आई-वडील आपल्या मुलांसाठी उत्तम आयुष्याची स्वप्ने पाहतात आणि त्यांना योग्य मार्गावर नेण्याचा प्रयत्न करतात. मात्र, काही वेळा हे मार्गदर्शन नकळत दबावामध्ये रूपांतरित होते. बऱ्याच वेळा आपल्याला हे जाणवतही नाही की आपण मुलांवर काही गोष्टी लादत आहोत, ज्यामुळे त्यांचा मानसिक विकास आणि आत्मविश्वास कमी होऊ शकतो. तुमच्या मुलांनी इतरांप्रमाणे यशस्वी व्हावे, स्पर्धेत टिकून राहावे, समाजात आदर्श निर्माण करावा, अशी प्रत्येक पालकाची इच्छा असते. पण हीच इच्छा कधी कधी त्यांच्या नैसर्गिक विकासाला अडथळा ठरू शकते. या लेखात आपण अशा पाच गोष्टींविषयी जाणून घेणार आहोत, ज्या गोष्टींसाठी पालकांनी मुलांवर कधीही जबरदस्ती करू नये. या गोष्टी त्यांना आनंदी आणि स्वावलंबी बनवण्यासाठी मदत करतील. बहुतांश पालक आपल्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी मुलांवर विशिष्ट करिअर निवडण्याचा दबाव टाकतात. डॉक्टर, इंजिनिअर, वकील, प्रशासनिक अधिकारी किंवा एखादा 'प्रतिष्ठित' व्यवसाय निवडावा, अशी अपेक्षा असते. मात्र, प्रत्येक मुलाची क्षमता आणि आवड वेगवेगळी असते. काहींना कला, संगीत, क्रीडा, अभिनय किंवा तंत्रज्ञानाची आवड असते. पण पालकांच्या अपेक्षांमुळे ती स्वप्ने मागे पडतात. एखाद्या क्षेत्रात जबरदस्ती करिअर निवडल्यास मुलांमध्ये नैराश्य निर्माण होऊ शकते आणि दीर्घकाळ टिकणारी असमाधानाची भावना निर्माण होऊ शकते. याऐवजी त्यांना त्यांची आवड ओळखण्यास मदत करा आणि त्यांच्या निर्णयांना आधार द्या. मुलांनी कोणत्या मित्रांसोबत राहावे आणि कोणाला टाळावे, याबाबत अनेक पालक अत्यंत नियंत्रक भूमिका घेतात. "या मुलासोबत राहू नकोस", "त्याच्यासोबत मैत्री कर", अशा सूचनांनी मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर विपरीत परिणाम होतो. प्रत्येक व्यक्तीला आपले सामाजिक नातेसंबंध स्वतः ठरवण्याचा हक्क असतो. काही वेळा पालकांचे म्हणणे योग्य असू शकते, पण केवळ आपल्या अपेक्षांनुसार त्यांना जबरदस्तीने मित्र निवडण्यास सांगणे चुकीचे आहे.

सोमवार
10 फेब्रुवारी 2025

मेष
दिवस अनुकूल आहे. आज कुटुंबासोबत वेळ घालवाल. घरात आनंदाचे वातावरण निर्माण होईल.

वृषभ
आज तुमच्या आजूबाजूचे लोक तुमच्या मेहनतीने प्रभावित होतील आणि तुमचे अनुसरण करतील.

मिथुन
व्यवसायात नेहमीपेक्षा चांगला फायदा होईल. आर्थिक बाजू पूर्वीपेक्षा मजबूत होईल.

कर्क
भाग्य तुम्हाला पूर्ण साथ देईल. जमीन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर ज्येष्ठांचे मत.

सिंह
या राशीच्या विद्यार्थ्यांसाठी दिवस समाधानकारक असेल, त्यांना काहीतरी नवीन शिकायला मिळेल.

कन्या
दिवस महत्त्वाचा असेल. आज तुम्हाला एखाद्या वयोवृद्ध व्यक्तीची सेवा करण्याची संधी मिळेल.

तूळ
सर्व प्रकारची कामे पूर्ण करण्यास तयार असाल. विचारपूर्वक केलेल्या कृतीतून फायदा होऊ शकतो.

वृश्चिक
प्रयत्न केल्यास यश मिळू शकते. दिवस तुमच्यासाठी नवीन आनंद घेऊन आला आहे.

धनु
राजकारणाशी संबंधित लोकांसाठी दिवस चांगला आहे, केलेल्या कामाचे कौतुक होऊ शकते.

मकर
आज तुम्हाला नोकरीत नवीन यश मिळण्याची शक्यता आहे. जीवनावश्यक वस्तू खरेदी कराल

कुम्भ
व्यवहार जलद होऊ शकतात. दिवस लाभदायक असेल. मोठी जबाबदारी मिळू शकते

मीन
जे काही काम करण्याचा प्रयत्न कराल, त्या कामात तुम्हाला यश मिळेल. मेहनतीचे फळ मिळेल

इवलेसे रोप लावियेले द्वारी

संत सम्राट ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या अल्पशा आयुष्यात सर्व जगाला धार्मिक व आध्यात्मिक उद्देश करण्याकरता विपुल संतवाङ्मयाची काव्यरचना केली. त्यामध्ये प्रामुख्याने श्रीमद्भगवद्गीतेवर केलेली मराठी टीका म्हणजे भावार्थदीपिका अर्थात ज्ञानेश्वरी हा ग्रंथ सर्व जगाने मान्य केला. तसेच अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, हरिपाठ यांचीही रचना केली. याच बरोबर इतर संतांप्रमाणे माउलींनी 'अभंग गाथा' या ग्रंथाची निर्मिती करून भक्तीकाव्य, रूपके, बालक्रीडा, गौळणी आणि विपुल अभंगरचना केली. ती आपण रेडिओवर अनेक वर्षे ऐकत आलो आहोत. सामान्य व्यक्तींना ज्ञानदेव अभंग गाथा याचा परिचय सुद्धा नसल्याचे समजते. त्यांच्या अनेक अभंगांमधून आपण 'इवलेसे रोप लावियेले द्वारी' या अभंगाचे अल्प विवरण करणार आहोत.

इवलेसे रोप लावियेले द्वारी |
त्याचा वेलू गेला गगनावरी ||
मोगरा फुलला मोगरा फुलला |
फुले वेचिता अतीभारु
कळियांसी आला ||
मनाचिये गुंती गुंफियेला शेला |
बाप रखुमादेवीवरु विठ्ठले अर्पिला ||

अर्थात अभंग जरी इवलासा असला तरी तो मोगऱ्याच्या वेलीप्रमाणे गूढ अर्थाने फोफावला आहे. याचे उत्कृष्ट व मार्मिक विवेचन माउलींनी केले आहे. परब्रम्ह परमात्म्याने सृष्टी निर्माण करताना अंडज, जारज, स्वेदज, उद्भीज या चार खाणीतून पशू, पक्षी, कीटक, जलचर, वृक्ष व मानव अशा चौऱ्यांशी लक्ष योनीची निर्मिती केली.

प्रत्येक जन्मात केलेल्या स्वकर्मानुसार त्या जीवाला पुढील योनीत जन्म घ्यावा लागतो. यापैकी मनुष्यजन्म हा शेवटचा जन्म मानला आहे. कारण इतर योनीत इच्छा असूनही परमेश्वराची प्राप्ती अथवा मुक्ती मिळवण्याचे साधन नाही. त्यामुळे एका एका योनीत कोटी कोटी वेळा जन्म घ्यावा लागतो.

पण मनुष्य जन्मात इतर जीवापेक्षा परमेश्वराने जीवाच्या उद्धारासाठी सद्सद्विवेकबुद्धी व वाणीची देणगी विशेषत्वाने दिलेली आहे. थोडक्यात मनुष्यजन्म म्हणजे एक रेल्वे जंक्शन आहे. येथून सर्व दिशेला रेल्वे गाड्या सुटतात. त्या सत्व, रज, तम या त्रिगुण रूपात असतात. आपण कोणत्या गाडीत बसायचे ते आपल्या कर्मावर अवलंबून आहे. दुष्टकर्मांने, वाममार्गाने आचरण केल्यास निकृष्ट योनीत जन्म मिळतो. म्हणजे सर्प, विंचू, व्याघ्र, वटवाघुळ इत्यादी. परंतु आपण मनुष्य जन्मांत नराचा नारायण होऊ शकतो. याचा उपदेश करण्यासाठी देवांनीच संतांचे अवतार घेऊन उपदेश केला आहे. त्यावर आपण विश्वास ठेवला पाहिजे. म्हणून माऊली याचे महत्त्व पटवून देतात.

मनुष्यदेहरुपी द्वारात 'ईवलेसे रोप' म्हणजे भगवंताची भक्ती. अर्थात हरिनामरुपी रोप लावले, म्हणजे मनुष्य देहात 'रामकृष्णहरी' या बीज मंत्राचा भक्तिप्रेमाने अंगीकार केला. तर त्या छोट्याशा रोपाचा वेल आकाशापेक्षा व्यापक असणाऱ्या परमात्मरूप, ब्रह्मस्थितीरूप मोक्षापर्यंत म्हणजेच जीवनमुक्ती पर्यंत वाढत जातो. आणि उद्धार होतो.

कलियुगी उद्धार हरीच्या नामे
हे मुक्तीचे मोठे शस्त्रच आहे.
अगदी याच अर्थाचे एक उत्कृष्ट रूपक संत तुकाराम महाराज यांनी दिले आहे.

हरिनाम वेली पावली विस्तार |
फळी पुष्पी भार ओल्हावली ||
तेथे माझ्या मना होई पक्षीराज |
साधावया काज तृप्तीचे या ||
मुळीचिया बीजे दाखविली गोडी |
लाहो करी जोडी झाली याची ||
तुका म्हणे क्षणक्षणा खातो काळ |
गोडी ते रसाळ अंतरेल ||

भावार्थ: हरीनाम रुपी वेली लता बरीच विस्तारले असून ऐहिक सुख साक्षात्कारात्मक फुलांनी टवटवीत झाली. गजबजली आहे. अरे माझ्या मना ! तुझे निरंकुशा तृप्तीरुपी अपेक्षित कार्य साधण्यासाठी तू या वेलीवर पक्षीराज होऊन वास्तव्य कर. कायम बैस. या हरिनामवेलीचे बीजभूत असणारा मूळ हरी तो गोड म्हणजे सुखरूप असल्यामुळे, हरिनामामुळे लाभणाऱ्या कृतकृत्यतारूपी फळातही त्या गोडीची अभिव्यक्ती होते. तीच गोडी व्यक्त होते. एवढ्याच साठी त्या फलप्राप्तीचे साधन जी हरिनाम भक्ती ती करण्याची तू त्वरा कर. श्री तुकोबाराय म्हणतात, क्षणाक्षणाला, हरघडीला तुझ्या आयुष्याचा काळ जात आहे. तू त्या हरिनामवेली वर बसण्याची दिरंगाई केलीस, अपेक्षा केलीस तर तुला त्याच्या रसाळ सुखमय मोक्षरूपी फळाची गोडी लाभणार नाही. त्या सुखाला तू अंतरशील. नामस्मरण प्रेमपूर्वक नाम भक्तीचे अनुष्ठान केल्यास प्रथम त्याचे चित्त शुद्ध होते व चित्तशुद्धी नंतर हरी गुरुकृपेने चित्तात ज्ञानाचा प्रकाश पडून वर्तमान देहातच भ्रमनिरासपूर्वक ब्रह्मस्वरूपाने जीवन मुक्ती प्राप्त होते. नाम हे अधिकार नसेल तर त्यास ज्ञानाचा अधिकार प्राप्तीचे साधन आहे. त्यामुळे चित्तशुद्धी होते. तसेच ते पुण्यद्वारा श्रीगुरूंची प्राप्ती करून देऊन महावाक्य श्रवणरूपी अंतरंग साधनेपर्यंत सहाय्य करते किंबहूना! प्रेमपूर्वक नामानुष्ठान करणाऱ्यास स्वतः भगवंतच गुरुरूपाने अवतीर्ण होऊन ज्ञानाचा उपदेश करतो.

माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव |
आपणचि देव होय गुरु ||

माझ्या विठोबाचा आपल्या अनन्य भक्ती विषयी कसा प्रेम भाव आहे! भक्ताने कृतकृत्यतेच्या हेतूने अनन्य भक्ती केली तर तो स्वतः सगुण अवतार घेऊन अद्वैत तत्त्वज्ञानाचा उपदेश करण्यासाठी गुरूही होतो. मग हळूहळू मनन-चिंतन निदिध्यासनामुळे संशय विपर्यासाची निवृत्ती होऊन शेवटी 'मी ब्रह्मरूप आहे' अशा व्यापक असणाऱ्या ब्रम्हाचे आत्मत्वाने अपरोक्ष ज्ञान होते. त्या वेलाचा विस्तार झाल्यावर त्या बोधने देह तादात्म्य भ्रांती नाहीशी होऊन 'जीवनमुक्तीचा' लाभ होतो. आता उर्वरित प्रारब्धानुसार आयुष्याची स्थिती

'मोगरा फुलला मोगरा फुलला |
फुले वेचिता अतिभारु
कळियांसी आला |'

फुले ही आनंदाची सुखाची द्योतक आहेत. जीवनमुक्त स्थितीत अक्षय्य तृप्ती झाली म्हणजे उर्वरित आयुष्य त्या मोगऱ्याची फुले म्हणजे जीवनमुक्तीचे विलक्षण सुख, ते वेचित असता, म्हणजे सेवन करीत असता पूर्व संस्काराच्या बळाने होणारा परमानंद संपत नाही. अशा सुखात्मक कळ्यांना अतिभार येतो.

सात्विक श्रद्धेचे किंवा अध्यात्म विद्येचे इवलेसे रोप मानव देहरूपी द्वारात लावले अर्थात वेली मोगऱ्याचे रोप लावले. कारण बटमोगरा व वेली मोगरा असे मोगऱ्यात दोन प्रकार आहेत. बट मोगऱ्याची वेल हळूहळू व सीमित मर्यादेपर्यंतच वाढते. बट मोगऱ्याची फुले ही अनेक पाकळ्यांचे वर्तुळाकार एकमेकात गुंतलेली असतात. अशा निदान चार पाच वर्तुळाकारांचे बट मोगऱ्याचे फूल भरदार होत असते. परंतु वेली मोगरा जसजसा वाढीला आश्रय मिळेल तसा तो हव्या तेवढ्या मोठ्या प्रमाणात वाढतो. वेली मोगऱ्याची फुले वर्तुळाकार एकेरी वाटोळ्या कळ्यांची असतात. ही फुले भरदार दिसत नाहीत, पण कळ्यांचा, फुलांचा बहर मात्र भरपूर येतो. या दोन्ही मोगऱ्यांना सुरेख सुगंध असतो. हा वेल पाहता-पाहता वाढत वाढत जाऊन आकाशाला भिडला. अध्यात्मविद्येच्या, आत्मविद्येच्या विस्तारामुळे व्यष्टी अंतःकरण विशिष्ट चैतन्य, आत्मचैतन्य जीवनदशारूपी भ्रांतीचा त्याग करून अध्यात्मज्ञानाचा मोगऱ्याचा वेल वाढत जाऊन समष्टी चिदाकाशाशी भिडला. म्हणजे विश्वाधिष्ठान शिवाधिष्ठान ब्रह्मचैतन्याशी ऐक्य पावल्याची साक्षात्कारात्मक अनुभूती आली. अर्थात मी सर्वव्यापक ब्रह्म आहे. अशी दिव्य अनुभूती आली.

शहरातील विकास प्रकल्पांसाठी

आमदार कुमार आयलानी यांनी घेतली पालिका आयुक्तांची भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगर शहराच्या विकासासाठी निर्णायक टप्प्यावर असलेल्या महत्त्वाच्या प्रकल्पांना गती देण्यासाठी आमदार कुमार आयलानी आणि महापालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्यात विशेष बैठक पार पडली. या बैठकीत शहरातील रस्त्यांचे काम, पाणीपुरवठा, नियमितीकरण प्रक्रिया, कचरा व्यवस्थापन, आणि उल्हासनगर महापालिकेच्या काही जागांचे व्यावसायिक रूपांतर यांसह विविध विषयांवर सखोल चर्चा झाली. या बैठकीचे परिणाम एका महिन्यात दिसून येणार असून, मार्चपर्यंत शहराच्या विकासाचे नवे पर्व सुरू होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

आमदार कुमार आयलानी यांनी नागरिकांच्या तक्रारींवर लक्ष केंद्रित करून शहरातील मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर भर दिला. त्यांनी विविध प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी आयुक्तांसमोर स्पष्ट मागण्या मांडल्या. रहिवाशांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी नवीन सॉफ्टवेअर विकसित करण्यात येत असून, मार्चपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होईल. शहरातील विविध भागांत सुरू असलेली रस्त्यांची कामे मार्चपर्यंत पूर्ण होतील. बेजबाबदार ठेकेदारांचे टेंडर रद्द करून कार्यक्षम ठेकेदारांना संधी दिली जाईल. १७ सेक्शन परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने पावले उचलली जातील. नागरिकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी ऑनलाइन तक्रार नोंदणी प्रणाली सुरू करण्यात येत असून, ई-ऑफिस प्रणालीद्वारे त्यावर कार्यवाही केली जाईल. चांगल्या कामगिरीसाठी कर्मचाऱ्यांना बढती देण्याचा निर्णय घेतला जाईल. नव्या मनपा इमारतीचा वापर करण्यासाठी स्थानिक आर्किटेक्ट्सचा समावेश केला जाईल. या मुख्य मुद्यावर चर्चा करण्यात आली.

मनपातील रिक्त पदे भरून विकासकामांना गती देण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली जाणार आहे. या योजनांमुळे शहरातील नागरी सुविधा सुधारतील आणि प्रशासन अधिक सक्षम होईल. या बैठकीनंतर आता उल्हासनगरच्या नागरिकांना पुढील काही महिन्यांत विकासाच्या दृष्टीने सकारात्मक बदल अनुभवायला मिळणार आहेत. शहराच्या विकासासाठी घेतलेले हे निर्णय उल्हासनगरच्या भविष्यासाठी टर्निंग पॉईंट ठरणार असल्याचे आमदार कुमार आयलानी यांनी म्हटले आहे.

मनपाच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी आणि शहराच्या विकासाला वेग देण्यासाठी ठोस निर्णय घेतले जातील. ई-ऑफिस प्रणालीमुळे नागरिक तक्रारींचे स्टेटस ट्रॅक करू शकतील. पाणीपुरवठा, ड्रेनेज, आणि नियमितीकरणासंबंधी विशेष पथक स्थापन करून मार्च अखेर सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. शहरातील मुख्य रस्त्यांचे आणि एमएमआरडीएच्या सात रस्त्यांचे काम वेगाने सुरू करण्यात येणार आहे. बेजबाबदार पद्धतीने काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, तर चांगली कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना बढती देण्यात येईल.

❍ मनीषा आव्हाळे, महापालिका आयुक्त

उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान

मूर्तींसाठी पीओपीचाच वापर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिशानिर्देशांचे तंतोतंत पालन करत पीओपी मूर्तीची निर्मिती, विक्री तसेच विसर्जन यावर राज्यभर बंदीबाबत उच्च न्यायालयाचे आदेश असताना या आदेशांची अंमलबजावणी न केल्याने राज्य सरकार आणि राज्यातील महापालिकांकडून उच्च न्यायालयाच्या या आदेशाचा अवमान करण्यात आला आहे. याविरोधात आता राज्य सरकार आणि राज्यातील महापालिकांच्या विरोधात उच्च न्यालयाच्या आदेशाचा अवमान केल्याप्रकरणी अवमान याचिका दाखल करणार असल्याची माहिती पर्यावरण तज्ज्ञ आणि याचिकाकर्ते रोहित जोशी यांनी दिली आहे. माघी गणेशोत्सवदरम्यान दीड दिवसाचे व पाच दिवसाचे पीओपी मूर्तींचे विसर्जन मुंबई महानगर प्रदेशातील तलावात, खाडीपात्रात, समुद्रात झाल्याचे पुरावे गोळा करून राज्य सरकार, पर्यावरण मंत्रालय, सर्व जिल्हाधिकारी, सर्व महानगरपालिका आयुक्त यांना पाठविले आहेत. मात्र अजूनही एकाही गुन्ह्याची नोंद एकही महानगरपालिकेने केलेली नसल्याचा आरोप याचिकाकर्त्यांकडून करण्यात आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या दोन्ही आदेशाचा राज्यभर अवमान झाला तरीही एकाही मंडळावर कारवाई झालेली नाही. राज्यातील सर्व महापालिकांना पीओपी मूर्तींवर कारवाई करण्यासाठी पुरेसा अवधी असूनदेखील राजकीय दबावापोटी कारवाई करण्यास कचरत असल्याचे याचिका कर्त्यांचे म्हणणे आहे. हमरापुर, जोहे या ठिकाणी लाखो पीओपी मूर्ती घडविल्या जातात, अशी माहिती याचिकाकर्ते रोहित जोशी यांनी दिली आहे.

मुंबईत सात नवीन

अग्निशमन केंद्र

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुंबई शहराची वाढती संख्या लक्षात घेऊन मुंबईत आणखी सात ठिकाणी नवीन अग्निशमन केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. कांदिवली, कांजूरमार्ग, सांताक्रूझ, चेंबूर व अंधेरी आणि सागरी किनारा मार्गालागत दोन अशी सात नवीन केंद्रे बांधण्यात येणार आहेत. त्यापैकी कांदिवली आणि कांजूरमार्ग येथील केंद्रे पूर्णत्वास आली आहेत.

मुंबईत कुठेही आग लागली तर अवघ्या काही मिनिटात अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचतात ही मुंबई अग्निशमन दलाची एकेकाळची ख्याती होती. मात्र मुंबईतील लोकसंख्या आणि वसाहती, गाड्यांची संख्या वाढल्यामुळे अग्निशमन दलाच्या गाड्या अनेकदा वाहतूक कोंडीत अडकून पडतात. त्यामुळे अग्निशमन दलाची केंद्रे वाढण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. त्यानुसार गेल्या काही वर्षापासून मुंबई महापालिकेने अग्निशमन दलाची केंद्रे वाढवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

अग्निशमन दलाची क्षमता व सुविधा सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत ठाकूर व्हिलेज – कांदिवली (पूर्व),एल.बी.एस. मार्ग – कांजूरमार्ग (प.) या दोन्हीही ठिकाणी नवीन अग्निशमन केंद्र बांधण्यात येणार आहेत. त्यापैकी कांदिवली केंद्राचे काम पूर्ण झाले आहे. कांजूरमार्ग येथील काम पूर्ण होत आले आहे.त्याचबरोबर जूहू तारा रोड – सांताक्रुझ (प.), माहूल रोड-चेंबूर व टिळक नगर येथे नवीन अग्निशमन केंद्र बांधण्याचे काम लवकरच हाती घेण्यात येणार आहे.

अग्निशमन दलाच्या दर्जोन्नतीसाठी चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात विविध प्रकल्पांसाठी १६० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तर २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात २६१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर सागरी किनारा मार्गालगत दोन ठिकाणी अग्निशमन केंद्र उभारण्यात येणार आहेत. मरीन ड्राईव्ह ते वरळी अशा सागरी किनारा मार्गाचे ९५ टक्के पूर्ण झाले असून हा मार्ग नुकताच पूर्ण क्षमतेने सुरु केला आहे. या मार्गावर एखादी दुर्घटना झाल्यास आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ सेवा देता यावी यासाठी पालिकेने सागरी किनारा मार्गालगत दोन अग्निशमन केंद्रे उभारण्याचे ठरवले आहे. त्यापैकी एक केंद्र वरळी परिसरात तर एक केंद्र प्रियदर्शीनी उद्यान परिसराच्या आसपास असेल अशी माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

उल्हासनगरमध्ये हवाला रॅकेट उद्ध्वस्त!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर शहरात काळ्या पैशाच्या अवैध व्यवहारांना मोठा हादरा बसला आहे. उल्हासनगर आणि कल्याण गुन्हे अन्वेषण शाखेने छापा टाकत तब्बल १ कोटी ६ लाख ३५ हजार २५० रुपयांची रोख रक्कम जप्त केली आहे. हा पैसा हवाला व्यवहारातून हस्तांतरित केला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. उल्हासनगर-२ मधील 'नरेश कलेक्शन' या दुकानावर ही धडक कारवाई करण्यात आली.

या छाप्यात २८ जणांना ताब्यात घेण्यात आले असून त्यातील १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून नोटीस बजावण्यात आली आहे. या घटनेनंतर शहरातील व्यापारी वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली असून, अवैध आर्थिक व्यवहारांमध्ये गुंतलेल्या इतर लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील अनेक व्यावसायिकांना चौकशीसाठी बोलावले जाण्याची शक्यता असून, हे रॅकेट केवळ उल्हासनगरपुरते मर्यादित नसून मुंबई, ठाणे आणि देशभरात पसरले असण्याचा पोलिसांना संशय आहे.

उल्हासनगर आणि कल्याण गुन्हे अन्वेषण शाखेला गुप्त माहिती मिळाली होती की, उल्हासनगरमध्ये मोठ्या प्रमाणावर हवाला व्यवहार सुरू आहेत. या माहितीच्या आधारे, पोलिसांनी शिस्तबद्ध पद्धतीने सापळा रचून 'नरेश कलेक्शन' या दुकानावर छापा टाकला. तपासा दरम्यान पोलिसांना मोठ्या प्रमाणात संशयास्पद कागदपत्रे, बँक व्यवहारांची माहिती आणि हवाला व्यवहारांची नोंद असलेली खाती हाती लागली. या छाप्यात जप्त केलेल्या कागदपत्रांवरून असे संकेत मिळत आहेत की, या हवाला रॅकेटचा संबंध अनेक शहरांशी असू शकतो. पोलिसांनी या व्यवहारातील प्रमुख लोकांचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. या रॅकेटचा तपास करताना पोलिसांना असे आढळले आहे की, हे हवाला नेटवर्क केवळ उल्हासनगरपुरते मर्यादित नसून मुंबई, ठाणे तसेच देशभरातील मोठ्या शहरांमध्ये कार्यरत असू शकते. हवाला व्यवहारांचा उपयोग अनेकदा अवैध आर्थिक देवाणघेवाण, बोगस कंपन्यांमार्फत काळ्या पैशाचे हस्तांतरण, अमली पदार्थांची तस्करी, तसेच देशविरोधी कारवायांसाठी निधी पुरवण्यासाठी केला जातो. त्यामुळे तपास यंत्रणांनी अधिक सखोल चौकशी सुरू केली आहे. तपासात हेही समोर आले आहे की, हवाला व्यवहारासाठी मोठ्या प्रमाणात चलनातून हिशोब नसलेले रोख पैसे वापरण्यात येतात, ज्याचा थेट परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. त्यामुळे हा गुन्हा अधिक गंभीर स्वरूपाचा आहे.

या कारवाईत मोठ्या प्रमाणात रोख रक्कम आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. प्राथमिक तपासात १४ जणाविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. पुढील चौकशीत हवाला रॅकेटच्या मूळ सूत्रधारांचा शोध घेतला जात आहे. हे नेटवर्क मोठ्या प्रमाणात कार्यरत असल्याचा संशय असून, लवकरच यामधील मुख्य आरोपींवर कठोर कारवाई केली जाईल.

– दीपक जाधव, तपास अधिकारी

राज्यातील कच्च्या कैद्यांबाबत हायकोर्टानं व्यक्त केली चिंता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यभरातील विविध तुरुंगांत अनेक कच्चे कैदी वर्षानुवर्षे खटला सुरू न होताच तुरुंगवास भोगताहेत. अशा कैद्यांना खटला सुरू न होताच तुरुंगात राहावे लागत आहे हे गंभीर वास्तव आहे. अशा परिस्थितीत 'लीगल एड'च्या वकिलांनी कायदेशीर मदत पुरवण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, जे कैदी खटल्याआधीच तुरुंगवास भोगताहेत, त्यांच्याबाबत न्यायालयाला माहिती दिली पाहिजे, असे महत्त्वपूर्ण निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

न्या. मिलिंद जाधव यांच्या एकलपीठाने कच्च्या कैद्यांच्या बाबतीत महत्त्वपूर्ण भूमिका घेतली आहे. हत्या प्रकरणातील आरोपीला तीन वर्षांहून अधिक काळ न्यायालयात हजर केले नाही. तो आरोपी जवळपास आठ वर्षे तुरुंगात आहे. त्याला खटला न चालवताच दीर्घकाळ तुरुंगवास भोगावा लागल्याच्या आधारे न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज मंजूर केला. अशा कैद्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी 'लीगल एड'च्या वकिलांनी पुढाकार घेतला पाहिजे, असे न्यायमूर्ती जाधव यांनी जामीन मंजूर करताना स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयाने विविध प्रकरणांत निर्णय देताना मूलभूत हक्कांबाबत स्पष्ट मते नोंदवली आहेत. जलदगतीने खटला चालवणे हा प्रत्येक कैद्याचा मूलभूत हक्क आहे. या हक्काचे रक्षण झालेच पाहिजे. त्यादृष्टीने कच्च्या कैद्यांच्या जामीन अर्जांवर वेळीच फैसला झाला पाहिजे, त्यांच्या जामीन अर्जांचा निपटारा व्हायला पाहिजे. याच पार्श्वभूमीवर 'लीगल एड'च्या वकिलांनी वर्षानुवर्षे खितपत असलेल्या कच्च्या कैद्यांना कायदेशीर मदत पुरवावी, असे निर्देश न्यायमूर्ती जाधव यांनी दिले आहेत.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
मालमत्ता विभाग

जाहिर निविदा सुचना क्र. ०९ सन २०२४-२५

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या ताब्यातील प्राथमिक शाळा / माध्यमिक शाळा या आरक्षणाची मालमत्ता ३० वर्षे कालावधीसाठी भाडेतत्वावर देणेबाबत.

१) निविदा विक्री दि. १०/०२/२०२५ ते दि. २७/०२/२०२५ रोजी वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील.
२) निविदा स्विकृती दि. १०/०२/२०२५ ते २७/०२/२०२५ रोजी वेळ सायंकाळी ५.० वाजेपर्यंत राहील.
३) निविदा पूर्व बैठक दि.२०/०२/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. अतिरिक्त आयुक्त-२, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या दालनात घेतली जाईल.
४) शक्य झाल्यास सदरची निविदा दि. २८/०२/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता ई-टेंडरींग विभाग नागरिक सुविधा केंद्र, येथे उघडण्यात येईल.
५) ही निविदा महापालिकेच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवरुन विक्री व स्विकृती करता येतील.

सर्व निविदा किंवा कोणत्याही निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखुन ठेवला आहे.

सही/-
उप आयुक्त (मालमत्ता)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण

जावक क्रमांक : कडोंमपा/ जसंवि/ मुका / १४६
दिनांक : ०७/०२/२०२५

पनवेलमधे भूसंपादन प्रक्रियेवर सात वर्षांपासून एकाधिकार?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पनवेल : विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका, मुंबई-बडोदे मार्गिका, विस्तारित तळोजा एमआयडीसी अशा महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी पनवेल आणि उरण तालुक्यांमध्ये राबवण्यात येत असलेल्या भूसंपादन प्रक्रियेबद्दल तक्रारी येत असतानाच गेल्या सात वर्षांपासून एकाच अधिकाऱ्याकडे या भूसंपादनाची जबाबदारी असल्याचे समोर येत आहे. सुरुवातीला तालुका प्रांताधिकारी म्हणून हे काम पाहणाऱ्या या अधिकाऱ्याची साडेतीन वर्षांनंतर दुसऱ्या विभागात बदली झाल्यानंतरही भूसंपादनाची 'जबाबदारी'ही त्यालाच देण्यात आली. अगदी निवडणूक काळातही बदलीपासून 'संरक्षित' राहिलेल्या या अधिकाऱ्याबाबत महसूल विभागातूनच कुरबुरी सुरू झाल्या आहेत.

गेल्या काही वर्षांत राज्यभरात विविध प्रकल्पांत राबवण्यात येणाऱ्या भूसंपादन प्रकल्पांमध्ये सक्रिय दलालांची साखळी आणि कोट्यवधींच्या उलाढालीमुळे ही जबाबदारी सांभाळणाऱ्या अधिकारी पदाला मोठे 'वलय' प्राप्त झाले आहे. त्यामुळे सध्या पनवेलच्या उपजिल्हाधिकारीपदावर कार्यरत असलेले दत्तात्रय नवले यांनी सात वर्षे पनवेलच्या भूसंपादन प्रक्रियेवर आपला अधिकार कायम कसा ठेवला, याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे. याबाबत रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र ते दिल्ली येथील बैठकीत व्यग्र असल्याने त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

नवले हे पनवेल व उरण तालुक्यांसाठीचे प्रांताधिकारी (उपविभागीय अधिकारी) म्हणून १० जानेवारी २०१८ रोजी रुजू झाले. या पदावर ते ९ ऑगस्ट २०२१ पर्यंत राहिले. या काळात त्यांनी मुंबई-बडोदे मार्गिका तसेच विस्तारित तळोजा एमआयडीसी प्रकल्पासाठी पनवेल तालुक्यात भूसंपादन प्रक्रिया राबवली. या भूसंपादनात कोट्यवधींच्या मोबदल्यांचे वाटप करण्यात आले. त्याच काळात विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेसाठी भूसंपादनाची प्रक्रियाही सुरू झाली. परंतु नवले यांच्या प्रांताधिकारी कार्यालयाने निवडणूक कामाच्या ताणाचे कारण देत विरार-अलिबागसाठीच्या भूसंपादनाची जबाबदारी पनवेलच्या मेट्रो सेंटर-१ कार्यालयाकडे सोपवण्याची विनंती केली. ती मंजूरही झाली. 'योगायोगाने' त्याच काळात नवले यांचीही उपजिल्हाधिकारी मेट्रो सेंटर १ कार्यालय येथे बदली झाली. तेथे त्यांच्याकडूनच विरार-अलिबाग मार्गिकेसाठीच्या भूसंपादनाची प्रक्रिया राबवण्यात येत आहे.

नवले यांची मेट्रो वन कार्यालयात बदली झाल्यानंतर त्यांच्याजागी राहुल मुंडके यांनी पनवेल प्रांताधिकारी म्हणून पदभार स्वीकारला. मात्र विरार-अलिबाग भूसंपादनाची जबाबदारी नवले यांच्याकडे गेल्याचे समजताच त्यांनी महसूल विभागाला पत्र पाठवून ही जबाबदारी पुन्हा प्रांताधिकाऱ्यांकडे देण्याचा आग्रह धरला. दोन्ही विभागांतील संभाव्य तणाव लक्षात घेता रायगड जिल्हाधिकारी आणि कोकण विभागीय आयुक्तांनी पनवेल तालुक्यातील ४१ गावांच्या भूसंपादनाच्या मोबदला वाटपाची जबाबदारी मुंडके यांच्याकडे तर उरण तालुक्यातील २३ गावांच्या मोबदला वाटपाचे काम नवले यांच्याकडे सोपवले. एकाच ठिकाणी तीन वर्षांपेक्षा जास्त काळ राहिलेल्या अधिकाऱ्यांची बदली करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीपूर्वी दिले होते. मात्र तत्कालीन जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांनी जिल्ह्याचे भूसंपादन समन्वयक म्हणून नवले यांच्याकडे जबाबदारी असल्याचे कारण दिल्याने निवडणूक आयोगाने नवले यांना बदलीतून सवलत दिली. निवडणूक पार पडल्यानंतर नवले यांना जिल्ह्याबाहेर पाठविणे अपेक्षित होते. त्याऐवजी पनवेल तालुक्यातील १३ गावांच्या रकमेच्या वाटपाचे अधिकार नवले यांना बहाल करण्यात आले.

निवडक गावे पुन्हा 'मेट्रो'कडे

विधानसभा निवडणुका संपल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने २३ डिसेंबर २०२४ रोजी काढलेल्या अधिसूचनेनुसार विरार-अलिबाग मार्गिकेसाठी जमीन संपादित होणाऱ्या पनवेल तालुक्यातील १३ गावांच्या मोबदला वाटपाचे अधिकार पुन्हा नवले यांच्या मेट्रो कार्यालयाकडे देण्यात आले आहेत. बोर्ले, मोरबे यांसारख्या गावांमध्ये जमिनीचे आणि पर्यायाने मोबदल्याचे दर सर्वाधिक आहेत. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महसूल विभागाचा एकाच अधिकाऱ्यावर दृढ विश्वास कसा, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. मी शासनाच्या आदेशाप्रमाणे काम करत आहे. तसेच विरार-अलिबाग प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी निधी प्राप्त नसल्याने सद्या:स्थितीत भूसंपादनाचे निवाडे जाहीर करण्यात आलेले नाहीत.

● दत्तात्रय नवले, मेट्रो सेंटर वन अधिकारी, पनवेल.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे ■ सोमवार
10 फेब्रुवारी 2025

४

jeevandeepvartanews2020@gmail.com

वाढीव पाण्याची ठाणेकरांना प्रतीक्षाच !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे, घोडबंदर, कळवा, मुंब्रा आणि दिवा परिसरात गेल्या काही वर्षांपासून पाणी टंचाईची सातत्याने जाणवत असतानाच, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी शुक्रवारी ठाण्याच्या मालमत्ता प्रदर्शन कार्यक्रमात बोलताना केलेल्या सुतोवाचामुळे ठाणेकरांची जलचिंता लवकरच मिटण्याची चिन्हे आहेत. ठाणे शहराला यंदाच्या वर्षात शंभर दशलक्षलीटर तर पुढील वर्षात शंभर दशलक्षलीटर असे दोनशे दशलक्षलीटर इतके वाढीव पाणी उपलब्ध होईल, अशी माहिती राव यांनी दिली आहे. ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी शहराच्या पाणी आराखड्याबाबत माहिती दिली. ठाणे शहरात सद्यस्थिती मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध असले तरी भविष्याचा विचार करून २०५५ पर्यंतचा पाणी आराखडा तयार करण्यात आलेला आहे. या आराख ड्यानुसार यंदाच्या वर्षात शंभर दशलक्षलीटर तर पुढील वर्षात शंभर दशलक्षलीटर असे दोनशे दशलक्षलीटर इतके वाढीव पाणी उपलब्ध होईल. यामुळे २०२६ मध्येच ठाणे शहरात पुढील २०३५ पर्यंत पुरेल एवढा पाणीसाठा उपलब्ध असेल, असा दावा आयुक्त राव यांनी केला.

हजारो स्पर्धकांचा कल्याण
सायक्लोथॉनमध्ये सहभाग

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

कल्याण : शिवसेना मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना कल्याण शहर शाखा, रवी पाटील फाऊंडेशन व कल्याणकर्स सायकलिंग यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण सायक्लोथॉन २०२५ मोठ्या उत्साहात पार पडली. कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त डॉ. इंदूराणी जाखड आणि पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झेंडा दाखवत सायक्लोथॉनला सुरवात झाली. कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी चौक येथून या सायक्लोथॉनला सुरवात होऊन आधारवाडी, खडकपाडा, बिर्ला कॉलेज, प्रेम ऑटो, स्टेट बँक मार्गे यशवंतराव चव्हाण क्रीडांगण येथे सांगता करण्यात आली. यावेळी विजेत्या स्पर्धकांना पारितोषिकं आणि स्पर्धेत सहभागी प्रत्येक स्पर्धकाला प्रशस्तीपत्रक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी एक हजारहून अधिक सायकलप्रेमी, विद्यार्थी आणि नागरिकांचा सहभाग होत उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याची माहिती शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील यांनी दिली.

बिर्ला कॉलेज एनएसएसआयच्या सहकार्याने
म्हारळ गावात आरोग्य तपासणी शिबीर

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

कल्याण : बी.के. बिर्ला कॉलेज, कल्याण, नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस, इंडियाच्या सहकार्याने शनिवारी गावदेवी मंदिर, म्हारळ गाव, कल्याण येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराचा उद्देश सर्वसमावेशक आरोग्य सेवा प्रदान करणे आणि विविध आरोग्य समस्यांबद्दल स्थानिक समुदायामध्ये जागरूकता निर्माण करणे हा होता. शिबिरात वैद्यकीय तपासणी आणि जनजागृती सत्रांचा समावेश होता.

नेत्र तपासणी, रक्त तपासणी, कर्करोग जागरूकता, ईसीजी चाचणी, सामान्य आरोग्य तपासणी, दंत तपासणी आदींचा म्हारळ येथील सुमारे 200 ग्रामस्थांनी सहभाग घेऊन या सेवांचा लाभ घेतला. वैद्यकीय सल्ल्याबरोबरच डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनवर आधारित मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. पौष्टिकतेला प्रोत्साहन देण्यासाठी सर्व उपस्थितांना भाजलेल्या चण्यासोबत गुळ देण्यात आला.

शिबिराचे उद्घाटन बी.के. बिर्ला कॉलेज संचालक डॉ.नरेश चंद्र यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अविनाश पाटील यांनी केले. यावेळी म्हारळ प्रभारी सरपंच योगेश देशमुख, डॉ. हरीश दुबे, उपप्राचार्य डॉ. महादेव यादव, महेश देशमुख, प्रा.महेंद्र खांडपेकर आणि डॉ. संदेश जायभाये आदी जण उपस्थित होते. बिर्ला कॉलेज, एनएसएस स्वयंसेवक आणि सीएसआयटी विद्यार्थ्यांच्या मदतीने जायनट्स क्लब ऑफ कल्याण आणि वासवदत्त फाउंडेशनने डॉक्टरांच्या समर्पित टीमसह महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

आयोजक नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस, इंडिया, त्यांच्या आर्थिक पाठिंब्याबद्दल आणि हा उपक्रम यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सर्व योगदानकर्त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतात. या उपक्रमाने आरोग्य जागरूकता आणि सुलभ आरोग्यसेवेचे महत्त्व अधोरेखित केले, ज्यामुळे म्हारल समुदायावर सकारात्मक प्रभाव पडला.

राहूल सोलापूरकरवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा
डोंबिवलीकरांचे मानपाडा पोलीसांना निवेदन

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



कल्याण : राहुल सोलापूरकर याने छत्रपती शिवरायांच्या बाबतीत अपमानास्पद व गुन्हेगारी स्वरुपाचे वक्तव्य केल्यामुळे त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी समस्त डोंबिवलीकरांच्या आणि शिवप्रेमी यांच्यावतीने सामाजिक कार्यकर्ते सत्यवान म्हात्रे यांच्या पुढकाराने मानपाडा पोलीसांना निवेदन देऊन करण्यात आली. यावेळी कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, कल्याण तालुका प्रमुख महेश पाटील, जिल्हा संघटक बंडू पाटील, विभाग प्रमुख तेजस पाटील, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते विकास देसले, गजानन व्यापारी, शिवप्रेमी संघटनेचे प्रकल्प चव्हाण, श्रद्धा पाटील आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल राहुल सोलापूरकर नावाच्या या इसमाने जाणिवपूर्वक जाहिरपणे सोशल मीडियावर अपमानास्पद व चुकीचे वक्तव्य केले आहे. त्यामुळे शिवप्रेमी लोकांच्या भावना दुखावल्या आहेत. राहूल सोलापूरकरचे कृत्य व वागणे हे महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्था निर्माण करणारे आहे. राहूल सोलापूरकरच्या या व्यक्तव्यामुळे महाराष्ट्रात शिवभक्तांनी प्रचंड संताप व्यक्त केला आहे. त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्याला तात्काळ अटक करण्यात यावी, यासाठी आज सकाळी डोंबिवली पूर्वेतील कावेरी चौक येथे समस्त डोंबिवलीकर आणि शिवप्रेमी जमा होऊन निषेध व्यक्त केला. यानंतर मानपाडा पोलीस स्टेशन मध्ये निवेदन देण्यात आले. लवकरात लवकर गुन्हा दाखल न झाल्यास स्थानिक भूमिपुत्र व शिवप्रेमी संघटना आणि समस्त डोबिवलीकर यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते सत्यवान म्हात्रे यांनी दिला आहे

राज्यस्तरीय साहित्य भूषण पुरस्कारने सुनील म्हसकर यांचा सन्मान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शुक्रवार, ७ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रथमेश सभागृह, टिटवाळा येथे वारकरी प्रकाशन आणि दैनिक साहित्यवारी यांच्यातर्फे पुस्तक प्रकाशन व पुरस्कार वितरण सोहळा, राज्यस्तरीय काव्य संमेलन ज्येष्ठ कवी तथा प्रसिद्ध साहित्यिक प्रा.चंद्रकांत दादा वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.याप्रसंगी साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबाबत शारदासुत सुनील म्हसकर यांस राज्यस्तरीय साहित्यभूषण पुरस्कार २०२५ या विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सुनील म्हसकर हे उत्तम लेखक, कवी, नाटककार, मुद्रितशोधक व परीक्षक, प्रभावी वक्ते, सूत्रसंचालक व निवेदक, तसेच गायक आहेत. ते "शारदासुत" या टोपणनावाने सुपरिचित असून आजतागायत विविध नामांकित अशा वर्तमानपत्र व नियतकालिके यांत त्यांचे साहित्य प्रकाशित झाले आहे. तसेच सुनील म्हसकर हे स्वामी विवेकानंद संस्था पाली, शहापूर या राष्ट्रीय पातळीवरील कार्य करणाऱ्या नामांकित संस्थेचे आणि अखिल भारतीय साहित्य व कलासंघाचे संस्थापक अध्यक्ष आहेत. आजतागायत त्यांना साहित्य क्षेत्रातील योगदानाबाबत अनेक पुरस्कार व सन्मान प्राप्त झालेले आहेत. त्यांस राज्यस्तरीय साहित्यभूषण पुरस्कार मिळाल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विजयकुमार भोईर, गुलाबराजा फुलमाळी, रवींद्र यशवंतराव, ज्येष्ठ संपादक व पत्रकार विजय यादव, नवनाथ रणखांबे, आयोजक कांचन गवळी, अनिता कळसकर, करूणा पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते प्रसिद्ध चित्रकार अरविंद शेलार, आनंद वैभवचे संपादक मधुकर आयरे, कवयित्री मंगल माने, लेखक भटू जगदेव, एन. ए. कदम यांच्यासह अनंत जाधव, अर्चना जाधव, भरत जोशी, कमलाकर मुळे, जगन्नाथ साळुंखे आदी ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी कुमार कृष्णा राहुल मुंढे यांच्या जन्मदिनानिमित्त संपन्न झालेल्या कविसंमेलनात ज्येष्ठ कवी राजेश साबळे, कवयित्री नंदा कोकाटे, शारदासुत सुनील म्हसकर, सुरेखा गायकवाड, अनिता कळसकर, सरोज गाजरे, अश्विनी म्हात्रे, श्याम बैसाणे , निवृत्ती कोरडे, भूषण ठाकरे, उमा रावते, धनंजय इंगळे, अकबर म्हमदुले, कुमारी यज्ञिका गायकर आदी कवींनी आपल्या सुंदर सुंदर रचना सादर करून रंगत आणली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप कांबळे यांनी केले.

खडवली मध्ये भटक्या कुत्र्यांचा उच्छाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

खडवली मध्ये भटक्या कुत्र्यांचा उच्छादखडवलीकल्याण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत बेहेरे अंतर्गत येणाऱ्या खडवली मध्ये पूर्व पश्चिम भागात भटक्या कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणावर उच्छाद वाढल्याने रात्री जाणाऱ्या कामगार वर्ग मजूर कष्टकरी व स्थानिक ग्रामस्थ यांना भीतीच्या वातावरणातून वावरावे लागत आहे या भटक्या कुत्र्यांची दहशत इतकी आहे की एकट्या दुकट्या माणसाला रस्त्याने जाणे दुरापास्त झाले आहे त्यामुळे ग्रुप ग्रामपंचायत बेहरे व आरोग्य विभागाने या भटक्या कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

ग्रुप ग्रामपंचायत बेहरे अंतर्गत येणाऱ्या खडवली हे पर्यटकांचे आवडते ठिकाण असून मध्य रेल्वेचे कल्याण कसारा मार्गावरील रेल्वे स्थानक आहे रेल्वे स्थानक असल्याने पूर्व पश्चिम भागामध्ये मोठ्या प्रमाणावर नागरी वस्ती वाढलेले आहे अशा वाढलेल्या नागरी वस्तीमध्ये दिवसेंदिवस भटक्या कुत्र्यांची संख्या वारे माफ वाढल्याने नागरिक दहशतीखाली वावरत आहेत गेल्या काही दिवसांमध्ये भटक्या कुत्र्यांकडून नागरिकांना चावा घेण्याचे प्रकार वाढलेले आहेत त्यातच लहान मुलांच्यावर ही भट्टी कुत्रे गटाने एकत्रित हल्ला करतात त्यामुळे रस्त्यावर खेळणाऱ्या मुलांनाही भटक्या कुत्र्यांची मोठी भीती झाली आहे त्यामुळे संबंधित विभागाने या भटक्या कुत्र्यांचा तात्काळ बंद असतो करून पूर्व पश्चिम भागातील वाढलेल्या भटक्या कुत्र्यांचा उच्छाद कमी करावा अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत

घर मोठ असण्यापेक्षा मन मोठं असलं पाहिजे - भरतशेठ गोगावले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पेण (प्रतिनिधी)

लोकांच्या प्रेमामुळे आज मी चार वेळा आमदार व नामदार झालो आहे. घर मोठे असल्यापेक्षा मन मोठे असले पाहिजे.माणूस मोठा झाला तरी त्याने जमिनीवर चालला पाहिजे हवेत चालणारा पडतो आम्ही गरिबांचे शेठ आहोत सरपंच ते आमदार व नामदार झालो पण कधी सत्तेची हवा डोक्यात जाऊ दिली नाही लोकांबरोबर राहून जनतेची कामे केली यामुळे चौथ्यांदा आमदार होऊन चौकार मारला आहे. नियत आणि नीतिमत्ता चांगली पाहिजे तर कोणी तुम्हाला हरवू शकत नाही असे प्रतिपादन रोजगार हमी योजना ओळखपादन खारभूमी विकास कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांनी केले. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने जयभवानी वाशी, वरसुआई वाशी व वैकुंठदादा पाटील मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा अजिंक्यपद व प्रौढ गट पुरुष व महिला जिल्हा निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन वाशी,वढाव रोड जवळील छत्रपती संभाजी महाराज मैदानावर करण्यात आले यावेळी नामदार गोगवले यांनी आपले विचार मांडले. यावेळी युवा नेते तथा वैकुंठदादा पाटील मित्र मंडळाचे आयोजक वैकुंठ पाटील, सचिव मिलिंद पाटीलआदि मान्यवर मंडळी उपस्थित होती. यावेळी नामदार भारत गोगावले यांनी स्पर्धेला उपस्थीत राहून मार्गदर्शन केले तसेच खेळाडूंना प्रोत्साहन देत खेळाचा आनंद लुटला.

प्रेक्षकांचे प्रेम हेच माझ्यासाठी भारतरत्न
ज्येष्ठगायिका आशा भोसले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे – मी कोणाकडे काहीही मागितले नाही. मला जितके पुरस्कार मिळाले ते माझा कर्तृत्वाने मिळाले. रसिक प्रेक्षकांनी मला इतके प्रेम दिले, इतके प्रेम कोणाला मिळत नाही. रसिक प्रेम हेच माझ्यासाठी भारतरत्न आहे असे मत ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी व्यक्त केले. स्वातंत्र्यवीर सेवा प्रतिष्ठानच्या वतीने शनिवारी आनंदोत्सव संगीत समारोहाचे आयोजन डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमात ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांची विशेष मुलाखत घेण्यात आली. यावेळी मंत्री प्रताप सरनाईक, उदय सामंत, शंभूराज देसाई, भरत गोगावले, प्रकाश आबिटकर, दिग्दर्शक आणि अभिनेते प्रवीण तरडे उपस्थित होते.

आ. रविंद्र पाटील यांचा
आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांशी थेट संवाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पेण (प्रतिनिधी) आदिवासी विकास विभागांतर्गत महाराष्ट्रातील सर्व शासकिय आश्रमशाळांना निवासी भेट देणेबाबत कार्यक्रम आयोजन करण्यासंदर्भात आदिवासी विकास विभाग यांनी ७ फेब्रुवारी रोजी पेण प्रकल्पातर्गत शासकिय माध्यमिक आश्रमशाळा सावरसई पेण येथील आश्रमशाळेस संवाद चिमुकल्यांशी या अभियानार्तगत आमदार रविशेठ पाटील, आदिवासी विभाग ठाणे अप्पर आयुक्त दीपककुमार मीना, उपआयुक्त प्रदीप पोळ व पेण कार्यालय अधिक्षक आनंद पाटील हे कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडी-अडचणीबाबत विचारपूस करून समस्या जाणून घेतल्या व शैक्षणिक वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. यावेळी आमदार रविशेठ पाटील यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना भविष्यात पुढे जाण्यासाठी मोठी स्वप्ने पाहण्याबाबत प्रेरीत केले व आपल्या गावाचे व समाजाचे नाव कसे मोठे होईल याबाबत प्रबोधन व मार्गदर्शन केले. अप्पर आयुक्त दीपककुमार मीना यांनी आदिवासी विभागामार्फत दहावी नंतर पुढील शिक्षणासाठी कोणकोणत्या सोयी-सुविधा उपलब्ध आहेत याबाबत मार्गदर्शन केले तसेच विविध क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शक यांना बोलावून विद्यार्थ्यांना करिअर गाईडन्स देणेबाबत सुचित केले. शाळेचे (प्रभारी) मुख्याध्यापक एस. आर. ठाकूर यांनी सदर कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थ्यांना दहावीनंतर कोणकोणते पर्याय उपलब्ध असतात याबाबत मार्गदर्शन केले.

हा कार्यक्रम प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. आभार प्रदर्शन स्त्री अधिक्षिका माने मॅडम यांनी केले. यावेळी अप्पर आयुक्त यांनी विद्यार्थ्यांनी मांडलेल्या समस्येच्या अनुषंगाने शालेय परिसराची पाहणी केली असता नवीन इमारतीपासून ते बहुउद्देशीय हॉल पर्यंतच्या अंतर्गत रस्त्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करणेबाबत निर्देश दिले.

महिला व बाल विभागामार्फत आदिवासी मुलींसाठी ज्यूडो कराटे प्रशिक्षण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागातील मुलींना स्वतःच्या संरक्षणासाठी तसेच आत्मरक्षण कौशल्ये विकसित करण्यासाठी जिल्हा परिषद महिला व बाल विकास विभाग, पालघर यांच्या माध्यमातून सन 2024-25 या वर्षाकरिता जिल्हा वार्षिक आदिवासी विकास योजनेअंतर्गत ज्यूडो कराटे आणि जीवन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.या उपक्रमाअंतर्गत जिल्ह्यातील 50 शाळांमध्ये प्रत्येकी 40 मुलींना जुडो कराटे प्रशिक्षण दिले जात आहे.त्या अनुषंगाने कै.दिगंबरराव पाडवी प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, आंबिस्ते येथे भेट देऊन जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर प्रवीण भावसार यांनी आढावा घेतला. त्यांच्या सोबत बाल विकास प्रकल्प अधिकारी, वाडा व पर्यवेक्षिका उपस्थित होत्या.प्राथमिक मुख्याध्यापक प्रशांत विलास जाधव आणि माध्यमिक मुख्याध्यापक दत्तात्रेय गोपाल दाते यांनी कार्यक्रमाचे महत्व अधोरेखित केले.यावेळी शिवनाथ पाटील, प्रशिक्षक, यांनी उपस्थित मुलींना जुडो कराटेच्या विविध कवायती आणि प्रात्यक्षिके करून दाखवली, ज्यामुळे विद्यार्थिनींमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला.मुलींसोबत संवाद साधताना त्यांच्या आत्मविश्वासात वाढ झाली असल्याचे मुलींनी यावेळी सांगितले. पाटील यांनी प्रशिक्षणाबद्दल समाधान व्यक्त केले व भविष्यात अशा प्रकारच्या प्रशिक्षणांची गरज असल्याचे सांगितले. प्रवीण भावसार यांनी या उपक्रमाच्या गरजेवर भर देत विद्यार्थिनींना आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण मिळणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे सांगितले. त्यांनी शाळा व्यवस्थापनाने या उपक्रमात दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले व यापुढेही अशा उपक्रमांचे आयोजन करण्यास प्रोत्साहन दिले.या महत्त्वपूर्ण उपक्रमामुळे आदिवासी भागातील मुलींमध्ये आत्मरक्षण व जीवन कौशल्ये विकसित होणार असून त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने हा उपक्रम लाभदायक ठरणार आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पालघर जिल्हा सरचिटणीस पदी विपुल पाटील

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर प्रतिनिधी : ऋषीकेश जाधव दै.ठाणे जीवनदीप वार्ता पालघर / महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री अजितदादा पवार आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते, सुनिल तटकरे - खासदार, तथा प्रांताध्यक्ष, संतोष मराठे - राष्ट्रीय कॉंग्रेस महाराष्ट्र प्रदेश सचिव यांच्या मार्गदर्शनाने आनंदभाई ठाकूर पालघर जिल्हा प्रमुख तथा माजी राज्यमंत्री यांच्या हस्ते, दिनांक ८ फेब्रुवारी २०२५ रोजी, त्यांच्या वाणगाव ता. डहाणू जि. पालघर येथील निवास स्थानी. विपुल रविंद्र पाटील यांची रा. कॉंग्रेस पालघर जिल्हा सरचिटणीस पदी तर मंदार संखे यांची पालघर उपजिल्हा प्रमुख पदी नियुक्ती पत्र देऊन नियुक्ती करण्यात आली आहे. या नवीन नियुक्तीन मुळे, पालघर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी पदाधिकारी, सदस्य, समर्थन कर्ते यांना नवीन चालन मिळणार आहे. यामुळे पालघर जिल्हा कोरकमिटी सदस्य यांनी नवीन नवनिर्वाचित पदाधिकारी यांचे स्वागत करीत असून, येत्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला त्याचा फायदा होणार आहे. असे स्थानिक राजकीय विश्लेषण कर्ते यांच्या कडून सांगण्यात येत आहे.

अटकेची भीती दाखवत डोंबिवलीत महिलेची फसवणूक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : मुंबई महापालिकेतून सेवानिवृत्त झालेल्या डोंबिवलीतील महाराष्ट्रनगर भागात राहत असलेल्या एका ५९ वर्षाच्या सेवानिवृत्त महिला अधिकाऱ्याला डिजीटल अरेस्टची भीती दाखवून तोतया पोलिसाने या महिलेकडून गेल्या महिन्यात ५१ लाख ३५ हजारू रूपये उकळले आहेत. आपली फसवणूक झाल्याचे आणि सेवानिवृत्तीची सर्व रक्कम तोतया पोलीस असलेल्या भामट्यांनी लाटल्याचे लक्षात आल्यावर सेवानिवृत्त महिलेने विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे. तोतया पोलिसाने सेवानिवृत्त महिलेला दृश्यध्वनी चित्रफितीमधून संपर्क साधला. बोलणारा इसम पोलीस वेशात होता.



'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून,
एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com